Consent H.M.P.

(1)

|| DECREE ||

हुकुमनामा हिंदु विवाह अर्ज क. २३/२०२६
ईश्वरी वि. वि. निरंक
निशाणी क्रमांक- २३/अ

मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) माजलगाव यांच्या न्यायालयात

एच.एम.पी.नं. 23 / २०२६

अर्जदार : १) ईश्वरी भ्र.अमरसिंह देशमुख (लग्नानंतरचे नाव)
ईश्वरी पि.विलास तौर (लग्नापुर्वीचे नाव)
वय : २२ वर्षे, धंदा : घरकाम,
रा.ईट ता.भुम जि.धाराशिव
ह.मु.काळेगावथडी, ता.माजलगाव जि.बीड



२) अमरसिंह पि.संजय देशमुख
वय : ३० वर्षे, धंदा : काही नाही,
रा.ईट ता.भुम जि.धाराशिव



विरुध्द

गैरअर्जदार: निरंक

प्रकरण : हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३ (ब) अन्वये विवाह विच्छेदन होवून मिळणे बाबत.

स.महोदय,

अर्जदार नं.१ व २ हे आपला विनंती अर्ज खालीलप्रमाणे देत आहेत,

१) असे की, अर्जदार नं.१ व २ यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्र व जाती रुढी पंरपंरेनुसार दि.२०/०६/२०२३ रोजी सौभाग्य मंगल कार्यालय, गढी रोड माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे संपन्न झालेला आहे. अर्जदार नं.१ व २ यांचे पतीपत्नीत्वाचे नाते अदयापही कायम आहे. लग्न संबंधातून उभयतांना कोणतेही मुलबाळ झालेले नाही अथवा आजरोजी अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ पासून गरोदर नाही.

२) असे की, अर्जदार नं.१ ही लग्नानंतर अर्जदार नं.२ यांचेकडे ईट येथे नांदावयास गेली. अर्जदार नं.१ व २ हे पतीपत्नी म्हणून सोबत पंधरा दिवस

राहिले परंतू त्यांचे अर्जदार नं.१ व २ हे एकमेकास समजुन घेत नसत तसेच एकमेकास वेळ देत नसल्यामुळे त्यांच्या स्वभावात मतभिन्नता होती. त्यामुळे त्यांच्यामध्ये आपसात पटेनासे झाले व त्यांचेमध्ये सतत मतभेद होवून भांडणे होवू लागले व सदर मतभेद जास्त वाढल्याने त्यांच्यामध्ये वितुष्ठ निर्माण झाले. अर्जदार नं.१ व २ मध्ये कोणतेही धार्मिक विधी संपन्न झालेले नसुन ते पतीपत्नी म्हणुन कधीच एकत्र आले नाहीत. त्यावेळी अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ यांना त्यांचे नातेवाईकांनी समजावून सांगून चांगला संसार करण्याची विनंती केली परंतू अर्जदार नं.१ व २ यांनी कोणाचेही काहीही ऐकले नाही.

३) असे की, अर्जदार नं.१ व २ हे सोबत एकत्र राहून संसार करु शकत नाहीत व पतीपत्नी म्हणून सोबत राहू शकत नाहीत त्यामुळे अर्जदार नं.१ हिला अर्जदार नं.२ च्या घरी जीवन जगणे अवघड झाले. त्यामुळे अर्जदार नं.१ ही स्वईच्छेने दिनांक ०६/०७/२०२३ रोजीपासून अर्जदार नं.२ पासून वेगळे होवून तिचे माहेरी आईवडीलांकडे काळेगावथडी ता.माजलगाव जि.बीड येथे राहत आहे.

४) असे की, त्यानंतर देखील अर्जदार नं.१ व २ यांचे दोन्हीकडील नातेवाईकांनी अर्जदार नं.१ व २ यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा खुप प्रयत्न केला परंतू अर्जदार नं.१ व २ हे एकमेकांसोबत राहणार नाहीत म्हणून असे त्यांचे ठाम मत असून त्यांना एकमेकांसोबत पतीपत्नी म्हणून राहणे जरुरीचे वाटत नाही तसेच भविष्यात ते पतीपत्नी म्हणून एकत्र नांदू शकत नाही म्हणून दोन्ही कडील नातेवाईकांनी प्रयत्न करुनही अर्जदार नं.१ व २ मागील अडीच वर्षापासून जास्त काळ एकमेकांपासून विभक्त राहत आहेत तसेच दोघांचे स्वभाव भिन्न असून अर्जदार नं.१ व २ हे एकत्र राहून संसार करु शकत नाहीत व कधी एकत्र येवु शकत नाहीत अशी दोघांनाही खात्री झालेली आहे.

५) असे की, अडीच वर्षापासून जास्त काळ अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ पासून विभक्त राहून आपले स्वतंत्र जीवन जगत आहे. मधल्या काळात अर्जदारांना

असे जाणवले की, आता यापुढील काळात उभयंताचे जीवन सुखाचे व समाधानाचे व्हावयाचे असेल तर दोघांनी आपआपसात असलेले पतीपत्नीत्वाचे नाते संमतीने व सहमताने कायमचे संपुष्टात आणणे संयुक्तीक ठरणार आहे.

६) असे की, अर्जदार नं.१ व २ यांनी आजपर्यंतच्या त्यांचे वैवाहिक आयुष्यात एकमेकापासून मनःस्ताप भोगला आहे व सदरच्या प्रकारामुळे अर्जदार यांच्या घरात सतत निर्माण होणारे गोंधळ व स्थिरता या सर्व बाबींचा विचार करुन अर्जदार नं.१ व २ यांनी पतीपत्नीत्वाचे नाते संपुष्टात आणून एकमेकांपासून घटस्फोट घेवून विभक्त होण्याचा निर्णय घेतला आहे. अर्जदार नं.१ व २ हे आडीच वर्षापासून अधिक काळ पतीपत्नी या नात्याने कधीच एकत्र आले नव्हते व एकत्र राहिले नाही. तसेच ते यापुढे एकत्र राहणार नाहीत अशी खात्री त्यांना पटली आहे.

७) असे की,अर्जदार नं.१ व २ व त्यांचे नातेवाईकामध्ये दि.२०/०२/२०२६ रोजी बैठक होवून उभयंतामध्ये झालेल्या बैठकीमध्ये नातेवाईकासमक्ष अर्जदार नं.१ व २ यांनी त्याचे वैवाहिक नाते कायमचे संपुष्टात आणण्याचे ठरवले असून संमतीने घटस्फोट घेण्यासाठी प्रकरण दाखल केले आहे.

८) असे की, अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ व त्याचे कुटुंबियाविरुध्द कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारची दिवाणी फौजदारी व इतर तत्सम कायद्यान्वये पोटगी मिळण्यासाठी व वाढीव पोटगी मिळण्यासाठी कार्यवाही दाखल केलेली नाही व यापुढे ही करणार नाही, तसेच अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ च्या विरुध्द त्याचे स्थावर जंगम मालमत्तेबाबत कोणताही दावा किंवा अर्ज दाखल करणार नाही. अर्जदार नं.१ हिस यापुढे पोटगी मागण्याचा अधिकार राहणार नसल्याचे तिने मान्य केलेले आहे. तसेच अर्जदार नं.१ ही तिचे अर्जदार नं.२ ची पत्नी म्हणुन असणारे सर्व हक्क व अधिकार हे अर्जदार नं.१ ही सोडुन देत आहे.

९) असे की, अर्जदारांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास दि.२०/०२/२०२६ रोजी अंतीम कारण घडले असून हीच अर्जाच्या अंतीम कारणोत्पत्तीची तारीख आहे.

१०) असे की, अर्जदार नं.१ व २ चे वास्तव्य व कारणोत्पत्तीची तारीख या मा.न्यायालयाचे अधिकार स्थळसिमेत असल्याने सदरचा अर्ज मा.न्यायालयास चालविण्याचा व त्यावर निर्णय देण्याचा मा.न्यायालयास अधिकार आहे.

११) असे की, अर्जदार अर्जाची आकारणी खालीलप्रमाणे करीत आहे,

अर्जदारांनी हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३(ब) प्रमाणे घटस्फोट मिळणे बाबत अर्ज दाखल केला असून अर्जाचे मुल्य १००० /- केले असून त्यावर कोर्टफिस रक्कम रुपये १००/- होते त्यामुळे अर्जावर रक्कम रु. १००/- कोर्टफिस दिलेली असून जी योग्य व पुरेशी आहे.

१२) असे की, प्रस्तुत अर्जामध्ये दुरुस्ती अथवा बदल करण्याचा हक्क अर्जदार मा.न्यायालयाचे पुर्व परवानगीने राखुन ठेवीत आहेत.

१३) असे की, अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं.१ व २ यांचा दिनांक २०/०६/२०२३ रोजी झालेला हिंदु धर्मशास्त्र व जाती रुढी परंपरेनुसार झालेला विवाह संपुष्टात आल्याचे घोषीत करुन अर्जदारांना एकमेकापासून घटस्फोट देणे योग्य व न्याय आहे.

१४) असे की, अर्जातील मजकुराच्या खरेपणाचे पुष्टयर्थ अर्जदार नं.१ व २ यांनी आपले शपथपत्र दिले आहे.

<u>तरी विनंती की,</u>

अर्जदारचा अर्ज मंजुर करुन असा आदेश करण्यात यावा की,

अ. अर्जदार नं.१ व २ यांचा दि.२०/०६/२०२३ रोजी झालेला हिंदु धर्मशास्त्र व जाती रुढी परंपरेनुसार झालेला विवाह संपुष्टात आल्याचे घोषीत करावे.

ब. अर्जदारांना त्यांचा विवाह विच्छेदन झाले बाबत हुकुमनामा पारीत करण्यात यावा.

क. ईतर योग्य तो न्यायाचा हुकम करण्यात यावा.

दिनांक : ०२/०३/२०२६

ठिकाण : माजलगाव.

अर्जदार नं.१ व २

वरील अर्जातील संपूर्ण मजकुर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे नमुद करण्यात आलेला असून संपुर्ण मजकुर आम्ही वाचून पाहिला व समजावून घेतला तो खरा व बरोबर असून आम्हाला मान्य व कबुल आहे.

दिनांक : ०२/०३/२०२६

ठिकाण : माजलगाव.

मार्फत :

ॲड.आर.आर.साबळे,

माजलगाव.

अर्जदार नं.१ व २

हिंदू विवाह अर्ज क्र. २३/२०२६
ईश्वरी व अमरसिंह —वि.— निरंक
निशाणी २३/अ

आज दिनांक 07/05/2026 रोजी मा. श्री एस. एस. बुद्रूक, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माजलगाव यांचे न्यायालयात अर्जदार क्र. 1 व 2 तर्फे ॲड.आर.आर. साबळे यांचे समक्ष प्रकरण निकाली निघाल्यावरुन असा हुकुम होत आहे की,

## ORDER

1. The petition is allowed.
2. The marriage between petitioner No.1- Sau. Ishwari W/o. Amarsingh Deshmukh, Age:22 years and petitioner No.2- Amarsingh S/o. Sanjay Deshmukh, Age:30 years, stands dissolved from today i.e. 07/05/2026 vide Section 13B of the Hindu Marriage Act, 1955.
3. Certified copies of decree be given to both petitioner free of costs vide Section 23 (4) of the Hindu Marriage Act.
4. Decree be drawn up, accordingly.

sd/-
(S. S. Budruk)
Civil Judge Senior Division,
Majalgaon

Dated : 07/05/2026.

(7)

**हिंदू विवाह अर्ज क्र. २३/२०२६**
**ईश्वरी व अमरसिंह –वि.– निरंक**
**निशाणी २३/अ**

याने दाव्याच्या खर्चाबद्दल रक्कम रूपये –– आज तारखेपासुन उग्रातीच्या तारखेपर्यंत त्यावर दरसाल दर शेकडा –– या दराने होणाऱ्या व्याजासह –– याजला द्यावे.

**खर्चाचा आकडा**

| | वादीचा झालेला | रूपये | पैसे | | प्रतिवादीचा झालेला | रूपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिर्याद अर्जास स्टॅम्प | 100 | 00 | १ | वजावटीला किंवा विरूध्द दाव्यास स्टॅम्प | – | – |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प नि. 2 व 3 | 10 | 00 | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प | – | – |
| ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प | 5 | 00 | ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प | – | – |
| | एकूण पुढील बाजुवर दिलेली– | – | – | | एकूण पुढील बाजुवर दिलेली– | – | – |
| ४ | साक्षीदारास पोटगी | – | – | ४ | साक्षीदारास पोटगी | – | – |
| ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी | 150 | 00 | ५ | प्लीडराची फी | – | – |
| | विरूध्द दाव्यावरील प्लीडराची फी | – | – | | प्लीडराची फी विरूध्द दाव्यावरील फी | – | – |
| ६ | प्रोसेसी लागू करणे | – | – | ६ | प्रोसेसी लागू करणे | – | – |
| ७ | कमिशनरची फी | – | – | ७ | कमिशनरची फी | – | – |
| ८ | भाषांतराची फी | – | – | ८ | भाषांतराची फी | – | – |
| ९ | नकला करण्याची फी | – | – | ९ | नकला करण्याची फी | – | – |
| १० | तहकुबीबद्दल दिलेला | – | – | १० | तहकुबीबद्दल दिलेला | – | – |
| ११ | वारस दाखल करण्याबद्दल अर्जावरील स्टॅम्प | – | – | | | – | – |
| | **एकुण** | **265** | **00** | | **एकुण** | 00 | 00 |
| | | | | | | – | – |
| | **न दिलेला खर्च** | – | – | | **न दिलेला खर्च** | – | – |
| | फिर्याद अर्जावरील | – | – | | विरूध्द दाव्यावरील | – | – |
| | प्लीडराच्या फीवरील | – | – | | प्लीडराच्या फीवरील | – | – |
| | प्रोसेसीवरील | – | – | | प्रोसेसीवरील | – | – |
| | दाखल झालेल्या कागदावरील (पुढील बाजुवर पहा) | 05 | 00 | | दाखल झालेल्या कागदावरील (पुढील बाजुवर पहा) | – | – |
| | **बाकी** | **260** | **00** | | **बाकी** | 00 | 00 |

आज तारीख 7 माहे मे सन 2026 रोजी
आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिला.

व.लि.
अर्जदार कं 1 व 2

(एस.एस.बुदूके)
दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), माजलगाव

गैरअर्जदारातर्फे वकील :– **निरंक**

हया मुकदम्यातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते (परत) नेले नसले तर अपील झाले असल्यास, अपीलाचा निकाल झाल्यावर नाश करून टाकण्यास पात्र होतील.

**हिंदू विवाह अर्ज क्र. २३/२०२६**
**ईश्वरी व अमरसिंह —वि.— निरंक**
**निशाणी २३/अ**

| वादीकडुन | | | | प्रतिवादीकडुन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रूपये | पैसे | | | रूपये | पैसे | |
| दिलेला खर्च | – | – | | दिलेला खर्च | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| दाखल झालेले कागद नंबर – | – | – | | दाखल झालेले कागद नंबर – | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | 0 | 00 | | | 0 | 00 | |
| | | | 0=00 | | – | – | 00=00 |
| न दिलेला खर्च | – | – | | न दिलेला खर्च | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| दाखल झालेले कागद नंबर – | – | – | | दाखल झालेले कागद नंबर – | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| नि., | 05 | 00 | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| | – | – | | | – | – | |
| **एकुण ...** | **5** | **00** | | **एकुण ...** | **0** | **00** | |
| | | | 5=00 | | | | 00=00 |